शिक्षण प्रसारक मंडळ, बांदा

# रावसाहेब गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड
# श्रीमती सरस्वतीबाई गणशेट वाळके कॉलेज ऑफ आर्टस्, बांदा

ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग पिन ४१६५११

('नॅक' पुनर्मूल्यांकित 'ब' श्रेणी प्राप्त)

www.gogatewalkecollege.com

आणि

## महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने

# ३२ वे वार्षिक अधिवेशन व राष्ट्रीय चर्चासत्र

**विषय : आंतरराष्ट्रीय संबंध - स्वरुप आणि आव्हाने**

**दि. १५, १६, १७ जानेवारी, २०१५**




## उद्घाटन समारंभ

गुरुवार दि. १५ जानेवारी २०१५ रोजी स. १० वा.

**उद्घाटक** : मा. ना. विनोदजी तावडे
(मानव संसाधन विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य)

**प्रमुख पाहुणे** : मा. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरु - मुंबई विद्यापीठ, मुंबई)

**अध्यक्ष** : मा. उमेश चंद्रसेन फातरफोड (प्रेसिडेंट - शिक्षण प्रसारक मंडळ, बांदा)

---

आदरणीय महोदय/महोदया

आपणास कळविण्यास आनंद होतो की आमच्या महाविद्यालयात महाराष्ट्र राज्यशास्त्र परिषदेचे ३२ वे अधिवेशन व राष्ट्रीय चर्चासत्र दि. १५, १६, १७ जानेवारी २०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनास आपण उपस्थित राहवे ही विनंती.

**महाविद्यालया संबंधी -**

रावसाहेब गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स आणि श्रीमती सरस्वती गणशेट वाळके कॉलेज ऑफ आर्टस् हे सन १९९५ मध्ये स्थापन झाले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा हे शहर पूर्णपणे डोंगराळ व ग्रामीण भागात समाविष्ट होते. मुंबई विद्यापीठाशी सलग्न असलेल्या या आमच्या महाविद्यालयात आर्टस्, कॉमर्स व सायन्स (बी, एस्. सी. कॉम्प्युटर सायन्स)या शाखांमधुन विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. एम्. ए., एम्. कॉम्. शिक्षण घेण्याची सुविधाही महाविद्यालयात उपलब्ध आहे. महाविद्यालयाने १९ वर्षाच्या कालावधीत शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेली आहे. महाविद्यालयाने 'नॅक'च्या पुनर्मूल्यांकनात 'ब' श्रेणी प्राप्त केली आहे.

**बांदा शहरासंबंधी -**

गोवा राज्याला लागून असलेले बांदा हे शहर तेरेखोल नदीच्या किनाऱ्यावर वसले आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग बांदा शहरातूनच जातो. गोवा मुक्ती आंदोलनात बांदा या शहराने महत्वाची भूमिका बजावली आहे. संतश्रेष्ठ सोहिरोबानाथ आंबिये हे याच बांदा गावचे सुपुत्र होते. मोपा हा नियोजित आंतरराष्ट्रीय दर्जाचा विमानतळ बांदा शहरापासून फक्त ३ कि. मी. अंतरावर आहे. ऐतिहासिक महत्व असलेले बांदा शहर हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू म्हणून उदयाला येत आहे.

**अधिवेशनासंबंधी -**

आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण महाविद्यालयाला महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन व चर्चासत्र घेण्याचा सन्मान मिळाला आहे. या अधिवेशनात आम्ही महाराष्ट्र व इतर राज्यातील मान्यवर अभ्यासकांना निमंत्रित करुन एक सकस चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न या निमित्ताने करणार आहोत. आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या घडामोडीचा परिणाम म्हणून 'आंतरराष्ट्रीय संबंध - स्वरुप व आव्हाने' हा महत्वपूर्ण विषय चर्चेसाठी निवडला आहे. जागतिक राजकारणातील बदलत्या स्वरुपाची व नव्याने निर्माण होणाऱ्या प्रवाहाची सकस चर्चा व्हावी असा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. जागतिकीकरणामुळे सध्या आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरुप बदलले आहे. राष्ट्र-राज्य व्यवस्थेतील बदल, क्षेत्रीय संघटना, युध्द, शांतता, देशोदेशीचे परराष्ट्र धोरण इ. मध्ये अमुलाग्र बदल घडून आला आहे व प्रत्येक राष्ट्रांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. या संबंधीची चर्चा अधिक सकस व्हावी या हेतूने प्रस्तावित ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन व चर्चासत्र वरील विषय केंद्रस्थानी ठेऊन आयोजित करण्यात आले आहे.

**शोधनिबंधाविषयी -**

मराठी भाषेसाठी - डी.व्ही.बी.टी. सुरेख व श्रीलिपी फॉन्ट व साईज १४.
इंग्रजी भाषेसाठी - Times New Roman हा फॉन्ट व साईज 12
शब्द मर्यादा - १५०० ते २००० शब्द
शोधनिबंधाची सॉफ्ट कॉपी-
gw_politics@rediffmail.com
gogate_walke@rediffmail.com
या इ-मेलवर दि. १० डिसेंबर, २०१४ पर्यंत पाठवावेत.

**नोंदणी शुल्क -**
प्राध्यापक - रु. १,०००/-
विद्यार्थी - रु. ५००/-
शोधनिबंध प्रकाशित करण्याकरता - रु. ५००/-
सदरील शुल्क, प्राचार्य, गोगटे - वाळके कॉलेज, बांदा
बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा बांदा
खाते क्र. ०६००१९७६५३३८
IFSC Code- MAHB0000068
MICR Code - 416014021
येथे जमा करुन पावती शोधनिबंधासोबत मेल करावी.

---

## कार्यक्रम पत्रिका

**गुरुवार दि. १५/१/२०१५**

स. ८ ते ९.३० नोंदणी व अल्पोपहार
स. १० ते १२ उद्घाटन समारंभ
दु. १२.३० ते १.३० बीजभाषण डॉ. अशोक नाईकवाडे (संमेलनाध्यक्ष-औरंगाबाद)
दु. १.३० ते २.३० भोजन
दु. २.३० ते ४ **प्रथम सत्र**
विषय : आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनाचे सैद्धांतिक दृष्टीकोन
प्रमुख वक्ते : डॉ. यशवंत सुमंत (विभागप्रमुख-राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ)
दु. ४ ते ५.३० **द्वितीय सत्र**
विषय : जागतिकिकरणाच्या कालखंडातील देशोदेशींच्या परराष्ट्र धोरणांचा आढावा.
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. शैलेंद्र देवळणकर (संचालक-गव्हर्मेंट कॉम्पीटेटीव्ह एक्झाम स्टडी सेंटर, (आय.ए.एस.) अमरावती)
सायं. ५.३० ते ६.३० **तृतीय सत्र**
विषय : प्रा. डॉ. भा. ल. भोळे स्मृती व्याख्यान
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे (संरक्षणशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ)
सायं. ६.३० ते ७.३० सांस्कृतिक कार्यक्रम
सायं. ७.३० ते ८.३० भोजन

**शुक्रवार दि. १६/१/२०१५**

स. ८.३० ते ९ अल्पोपहार
स. ९ ते १० **चौथे सत्र**
विषय : आंतरराष्ट्रीय संघटना-भूमिका आणि यशापयश
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. राजेश खरात (जे.एन.यु. दिल्ली)
स. १० ते ११ **पाचवे सत्र**
विषय : क्षेत्रीय संघटना-भूमिका यशापयश
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. वासंती रासम (राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)
स. ११ ते दु. १ **सहावे सत्र**
विषय : राज्यशास्त्र व्यवस्थेतील बदल आणि समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण
प्रमुख वक्ते : डॉ. अशोक चौसाळकर (राजकीय विचारवंत, कोल्हापूर)
दु. १ ते २ भोजन
दु. २ ते ३.३० **सातवे सत्र**
विषय : युद्ध व शांतता-शक्यता आणि आव्हाने
प्रमुख वक्ते : डॉ. केतन गोवेकर (धेंपे कॉलेज, पणजी-गोवा)
दु. ३ ते ५.३० **आठवे सत्र**
परिसंवाद - विषय : महाराष्ट्र विधानसभा निवडणुका २०१४
सहभाग : प्रा. डॉ. सुरेंद्र जोंधळे, प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. डॉ. प्रकाश पवार, अलका धुपकर (आय.बी.एन. लोकमत)
सायं. ५.३० ते ६.३० **नववे सत्र**
विषय : डॉ. मोईन शाकीर स्मृती व्याख्यान
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. संजय चतुर्वेदी (प्रोफेसर-राज्यशास्त्र विभाग, डायरेक्टर-सेंटर फॉर दी स्टडीज ऑफ जिओपॉलिटीक्स, द ऑनररी डायरेक्टर, सेंटर फॉर दी स्टडी ऑफ मिडवेस्ट आशिया, पंजाब विद्यापीठ चंदीगढ)

---

सायं. ६.३० ते ७.३० **दहावे सत्र**
विषय : महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची आमसभा
अध्यक्ष : प्रा. डॉ. पी. डी. देवरे
सायं. ७.३० ते ८.३० **भोजन**

**शनिवार दि. १७/१/२०१५**

स. ८.३० ते ९ अल्पोपहार
स. ९ ते १० **अकरावे सत्र**
विषय : जागतिक राजकारणातील भारताची भूमिका
वक्ते : प्रा. डॉ. सुरेंद्र जोंधळे (राज्यशास्त्र विभाग प्रमुख-मुंबई विद्यापीठ)
स. १० ते ११.३० **बारावे सत्र**
विषय : आंतरराष्ट्रीय राजकारणातील समकालीन आव्हाने
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. लियाकत खान (राज्यशास्त्र विभाग-मुंबई विद्यापीठ)
प्रा. डॉ. एस. ए. पालेकर (राज्यशास्त्र विभाग-गुलबर्गा विद्यापीठ, कर्नाटक)
दु. १२ ते १.३० **समारोप समारंभ**
प्रमुख पाहुणे : मा. भास्कर नायक (संचालक-उच्च शिक्षण विभाग-गोवा राज्य)

आपले विनित,

| | | |
|---|---|---|
| श्री. उमेश चंद्रसेन फातरफोड | प्रा. डॉ. अशोक नाईकवाडे | प्रा. डॉ. पी.डी. देवरे |
| स्वागताध्यक्ष | संमेलनाध्यक्ष | अध्यक्ष |
| डॉ. एस. बी. सावंत | प्रा. डॉ. यशवंत सुमंत | प्रा. मनोहर पाटील |
| प्राचार्य-गोगटे वाळके कॉलेज, बांदा | मार्गदर्शक | सचिव |
| | प्रा. एस. पी. वेल्हाळ | |
| | संयोजन सचिव | |

---

निवासव्यवस्था आनंदी मंगल कार्यालय, बांदा आणि महाविद्यालयात करण्यात आली आहे. जानेवारी महिना थंडीचा असल्याने येताना स्वेटर, शॉल इ. साहित्य बरोबर घेऊन यावे.

**अधिक माहितीसाठी संपर्क -**
प्रा. एस्. पी. वेल्हाळ- 9422576689
प्रा. के. के. म्हेत्री - 9422373361




बुक-पोस्ट

प्रति, ______________________

______________________

______________________

प्रेषक,
प्राचार्य,
रावसाहेब गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड
श्रीमती सरस्वतीबाई गणशेट वाळके कॉलेज ऑफ आर्टस्, बांदा